महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/तेवीस दिनांक:-१७ ऑगस्ट, २०२१

# -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- पदांचे पसंतीक्रम निवड करण्यास मुदतवाढ देण्याबाबत**

**संदर्भ:**-(१) महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०१९ व महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा २०१९ पदांचे पसंतीक्रम निवडीसंदर्भातील दिनांक ५ ऑगस्ट, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

(२) राज्य सेवा मुख्य परीक्षा २०१९ पदांचे पसंतीक्रम निवडीसंदर्भातील दिनांक १२ ऑगस्ट, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित विविध भरतीप्रक्रियास अनुसरुन पदांचा पसंतीक्रम सादर करण्यासंदर्भात संदर्भिय प्रसिध्दीपत्रकांद्वारे मुदत देण्यात आली होती. सदर प्रसिध्दीपत्रकांस अनुसरुन संबंधित परीक्षांसाठी पदांचे पसंतीक्रम सादर करण्यास पुढीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | परीक्षेचे नाव | पदांचे पसंतीक्रम सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | १७/२०१९ | महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा २०१९ | दिनांक १९ ऑगस्ट, २०२१, २३:५९ वाजेपर्यंत |
| २ | १२/२०१९ | महाराष्ट्र वनसेवा मुख्य परीक्षा २०१९ | दिनांक १९ ऑगस्ट, २०२१, २३:५९ वाजेपर्यंत |
| ३ | ०७/२०१९ | राज्य सेवा मुख्य परीक्षा २०१९ | दिनांक २३ ऑगस्ट, २०२१, २३:५९ वाजेपर्यंत |

२. पदांचे पसंतीक्रम निवडीसंदर्भात उमेदवारांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे:-

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील ONLINE FACILITIES मधील Post Preference या लिंकवर क्लिक करावे.

(२) उपलब्ध होणा-या परीक्षांच्या यादीमधून परीक्षेची निवड करावी.

(३) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करुन सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करुन लॉगीन करावे.

(३) उपलब्ध होणा-या नमुन्यामध्ये पदांचे पसंतीक्रम नमूद करण्यात यावेत.

३. पदांच्या पसंतीक्रमासंदर्भातील इतर तरतुदी संदर्भीय प्रसिध्दीपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणेच राहतील.

४. उपरोक्त विहित कार्यपध्दतीनुसार पदांचे पसंतीक्रम सादर करताना कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा १८००-२६७३-८८९ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर संपर्क साधता येईल.

ठिकाण:-मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग